SPECIAL OFFERS
ई-पेपर वेबसाईट बनवा
फक्त २९९९/-
SAVE UP TO 90%
NEWS
9359421909
ONLY THIS WEEK!
ORDER NOW
www.abhibee.com

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०२ ● अंक : १०२ ● पुणे ● शुक्रवार, दि. २८ फेब्रुवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



वृक्षसंवर्धनासाठी दोडके सरसावले 3



२१ हजार माथाडी कामगारांच्या हाती 'कमळ'! 4

## ठळक बातम्या

### रेल्वे स्टेशनवर खराब पदार्थांची विक्री

**पुणे (आरंभ पर्व) :** रेल्वे स्टेशन येथे 'आयआरसीटीसी'च्या नावाने सुरू असलेल्या स्टॉलमध्ये खराब पदार्थांची विक्री केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. प्रवाशांनी स्टॉलचालकास जाब विचारल्यानंतर त्याने प्रवाशांसोबत वाद घातला. रेल्वे स्टेशनवर खराब पदार्थांची विक्री होत असताना रेल्वे प्रशासन करतेय काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. पुणे रेल्वे स्टेशन येथील आयआरसीटीसी कॉफीशल फास्ट फूड सर्व्हिस सेंटर येथून एका प्रवाशाने बुधवारी वडापाव खरेदी केला; पण तो वडापाव खूपच खराब झाला होता. त्याचा वास येत असल्याचे प्रवाशांच्या लक्षात आले. त्यांनी स्टॉलचालकास विचारणा केली; पण तो वडापाव खराब झाल्याचे मान्यच करत नव्हता. त्यावेळी पुणे ग्रामीण रेल्वे प्रवासी ग्रुपच्या सदस्यांनी त्याला जाब विचारत त्याचा व्हिडीओ काढण्यास सुरुवात केली. रेल्वे स्टेशनवर खराब पदार्थ विक्री केली जात असून, हा प्रवाशांच्या जीवाशी एकप्रकारे खेळच आहे. रेल्वे प्रशासनाने कडक कारवाई करावी, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

### शेतात अफूची लागवड करणाऱ्यास अटक

**पिंपरी (आरंभ पर्व) :** देहूरोड पोलिस ठाण्याच्या हद्दीत काळोखे मळा आणि हगवणे मळा येथे शेतात लावलेली अफूची झाडे जप्त करण्यात आली. पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने बुधवारी (दि. २६ फेब्रुवारी) ही कारवाई केली. दिलीप चंद्रकांत काळोखे (५७, रा. काळोखे वस्ती, देहूगाव) असे अटक केलेल्याचे नाव आहे. पोलिस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, अमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलिस कर्मचारी किशोर परदेशी आणि जावेद बागसिराज यांना माहिती मिळाली की, देहूगाव येथे काळोखे मळा आणि हगवणे मळा येथे एका व्यक्तीने त्याच्या शेतामध्ये अफूची झाडे लावली आहेत. त्यानुसार पोलिसांनी दिलीप काळोखे याच्या शेतात छापा मारून कारवाई केली. शेतामध्ये कांद्याच्या पिकात अफू लावला होता. अफूच्या झाडांना फुले, बोंडे आली होती. पोलिसांनी तीन लाख २७ हजार रुपये किमतीची २१८ अफूची झाडे जप्त केली.

### शेअर बाजारासारखी लसणाचीही घसरगुंडी!

**सांगली (आरंभ पर्व) :** लसणाचा दर मागील दोन महिन्यांत ४०० रुपये प्रतिकिलोवर पोहोचला होता. मात्र, आता आवक वाढल्यामुळे आता दर ८० ते १०० रुपये प्रतिकिलोवर आला आहे. राज्यातील ३०६ बाजार समित्यांच्या आवारातील बाजारात सध्या रोज ८ ते १० हजार टन लसणाची आवक सुरू आहे. घाऊक बाजारात सध्या लसणाला प्रतवारीनुसार, प्रति क्विंटल ४,००० ते ९,००० रुपये असा दर मिळत आहे. किरकोळ बाजारात एक किलो लसणाची विक्री प्रतवारीनुसार, ८० ते १०० रुपये किलो दराने केली जात आहे.

# कारखान्याची निवडणूक लढविण्याचे युगेंद्र पवारांचे संकेत



**बारामती (दै. आरंभ पर्व)**

सहकारी साखर कारखान्याचे निवडणूक ही राजकीय पक्षावर नाही तर शेतकऱ्यांच्या विचारावर लढली जाते,साखर कारखाना हा शेतकऱ्यांच्या मुळे चालतो, बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखाना हा ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांचा कारखाना म्हणून राज्यात ओळखला जातो, जेष्ठ नेते शरद पवार हे स्वतः त्या कारखान्याचे सभासद सुद्धा आहेत, त्यांनी याच साखर कारखान्याच्या विकासा साठी खूप काही विकास कामे केलेली आहेत, असे असताना सुद्धा ऊस उत्पादक शेतकरी वर्गामध्ये मध्ये सध्या नाराजी आहे, कारखान्याचे स्वाभिमानी सभासद यांची जर मागणी असेल तर आम्ही पूर्ण ताकद त्यांच्या पाठीशी लावणार आहोत. असे स्पष्ट संकेत युवा नेते युगेंद्र पवार यांनी दिले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष्याचे (शरद पवार ) युवा नेते युगेंद्र पवार त्यांनी आज बारामतीत प्रसार माध्यमांशी संवाद साधताना आपले मत व्यक्त केले, श्री. युगेंद्र पवार बोलताना म्हणाले, "ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी माळेगाव सहकारी साखर कारखान्याच्या विकासासाठी खूप भरीव कामगिरी केली आहे, कारखान्याच्या सभासदांचा विचार करून सहवीज प्रकल्प, अभियांत्रिकी महाविद्यालय, पॉलिटेक्निकल महाविद्यालय, कारखान्या अंतर्गत विविध सुविधा उपलब्ध करून दिले आहेत, कारखान्याच्या ऊस उत्पादक सभासदांची आणि कार्यकर्त्यांची एक बैठक सुद्धा आयोजित केली होती, या बैठकीमध्ये सभासदांचे विचार,अडचणी आम्ही समजावून घेतल्या आहेत , या बैठकीमध्ये अनेक शेतकऱ्याचे मत असे होते की,"आपण या निवडणुकीमध्ये शेतकऱ्यांच्या मागे उभे राहिले पाहिजे, शेतकऱ्यांना ताकद दिली पाहिजे," आता या पुढील होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये सुद्धा कार्यकर्त्यांच्या मागणीनुसार कार्यकर्त्यांना आम्ही ताकद देणार आहोत, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत, नगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या येणाऱ्या निवडणुकीत सुद्धा आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून लढण्याच्या विचार करीत आहोत, शेवटी आमचाही राजकीय पक्ष आहे, आणि पक्षाच्या वाढीसाठी आम्ही सदैव कार्यकर्त्यांच्या मागे खंबीर पणे उभे राहिलेच पाहिजे,असे संकेत सुद्धा युवा नेते युगेंद्र पवार यांनी दिले आहेत, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार ) हे आपली माळेगाव साखर कारखान्याची सत्ता पुन्हा मिळविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याने या वेळी निवडणुकीत मोठी चुरस निर्माण होणार आहे, माळेगाव सहकारी साखर कारखान्याची निवडणूक अद्याप जाहीर झालेली नसली तरी राजकीय हालचालींना कमालीचा वेग आल्याचे दिसून येत आहे.

बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याची निवडणूक लवकरच रंगतदार होणार असल्याची शक्यता आहे, सभासदांची यादी प्रसिद्ध केली जात असून सभासदाच्यात नावात वाढ झाल्यामुळे सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ बनले आहे, अशी माहिती कारखान्याचे माजी अध्यक्ष आणि विद्यमान संचालक रंजन तावरे यांनी बोलताना दिली. दरम्यान, माळेगाव सहकारी साखर कारखान्यावर सध्या राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची एक हाती सत्ता आहे, हा कारखाना जेष्ठ नेते शरद पवार यांनी आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नावारूपाला आणून प्रगतीपथावर नेला आहे, परंतु मध्यंतरच्या काळामध्ये पवार विरोधातील जेष्ठ नेते चंद्रराव तावरे आणि रंजन तावरे यांनी या साखर कारखान्यावर विजय मिळवून पवार यांना धक्का दिला होता, राज्यातील पहिल्या पाच कारखान्यांमध्ये बारामतीच्या माळेगाव साखर कारखानाचा समावेश करण्यात येतो.

## आ. काशिनाथ दाते यांचा नारायणगव्हाण येथे पेढे तुला!




**पारनेर (दै. आरंभ पर्व)**

नारायणगव्हाण येथील भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या प्रसिद्ध चुंबळेश्वर महादेव मंदिरात आमदार काशिनाथ दाते यांची पेढे तुला करण्यात आली. पारनेर नगर विधानसभा मतदारसंघातून श्री काशिनाथ दाते सर विजय व्हावेत यासाठी बाळासाहेब चव्हाण,काशिनाथ नवले, अण्णा चव्हाण,संजय शेळके बाळासाहेब नवले,अण्णासाहेब नवले, मेजर सतीश चिपाडे, दगडू हारदे या तरुणांनी दाते सर निवडून आल्यावर मंदिरात पेढे तुला करण्यात येईल असे महादेवाला साकडे घातले होते व मतमोजणीच्या दिवशी सदर तरुणांनी मंदिरात ठाण बैठक मांडली होती. कार्यक्रमा प्रसंगी आमदार दाते म्हणाले की आमदारकीच्या माध्यमातून सुपा गटातील गावांच्या विकासात्मक कामाचा प्रश्न सोडवण्यासाठी माझा प्रयत्न राहील.चुंबळेश्वर महादेव मंदिराचा तीर्थक्षेत्र क वर्ग मान्यतेसाठी त्वरित सर्व कागदपत्रासह प्रस्ताव दाखल करा जिल्हा नियोजन बैठकीत मान्यता मिळावी म्हणून मी प्रयत्न करेल.

## डॉ. प्रभू व्यास यांना पुण्यात पुरस्कार प्रदान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सुखी वैवाहिक जीवनामध्ये लैंगिक समस्या या अनेकदा अडसर ठरतात, तसेच संतानप्राप्तिमध्येही समस्या उत्पन्न होतात. यातून बऱ्याचदा नाती तुटतात आणि त्यातून मोठी सामाजिक समस्यादेखील तयार होते. या स्थितीत सातत्याने लैंगिक समस्यांविषयी सविस्तर माहिती देऊन त्यांचे निराकरण करणारे तसेच सुखी वैवाहिक जीवनासाठी सखोल मार्गदर्शन देणारे सेक्सोलॉजी मधील एम.एस.(सेक्स), पी .जी.डिप्लोमा (सेक्स), पीएचडी (सेक्स), करणारे डॉ. प्रभू व्यास यांना नुकताच इन्स्पायरिंग सेक्सोलॉजिस्ट पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. व्यास यांनी सेक्सोलॉजी संदर्भात केलेल्या सखोल संशोधनाबद्दल त्यांचा गौरव करण्यात हा आला.

पुण्यातील पीवायसी हिंदू जीमखाना येथे झालेल्या सेक्सोलॉजिस्टच्या या राष्ट्रीय परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय कीर्तीचे डी. हार्टमॅन (अमेरिका), केईएम मुंबईचे सुप्रसिद्ध सेक्सोलॉजिस्ट डॉ. प्रकाश कोठारी, नानावटी सुपर स्पेशालिटीचे डॉ. राज ब्रम्हभट, चेन्नई अपोलो हॉस्पिटलचे सेक्सोलॉजिस्ट डॉ. नारायण रेड्डी, सेक्सोलॉजिस्ट संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष जी. व्यंकटरमणा (हैदराबाद) या सर्वांनी डॉ. व्यास यांना ट्रॉफी, सर्टिफिकेट, पुणेरी पगडी, शाल व मेडल देऊन सत्कार करण्यात आला.

पुरस्कार प्रदान केल्यानंतर सुप्रसिद्ध सेक्सोलॉजीस्ट डॉ. प्रभू व्यास म्हणाले की, आजच्या काळात संवाद आणि संचार माध्यमे वाढली असतानाही आपल्या परिवारातील लोकांशी आपला संवाद मात्र कमी झाला आहे. त्यातही लैंगिक समस्यांवर तर अजिबातच संवाद नसल्याने कौटुंबिक कलह तीव्र झाले आहेत. परंतु या समस्येवर उपाय आहे. त्यासाठी योग्य ते काउन्सलिंग आवश्यक आहे. योग्य व अनुभवी सेक्सोलॉजीस्टकडे आपल्या समस्या मांडून होणाऱ्या संभाव्य गंभीर परिणामांना टाळले जाऊ शकते. प्रगत राष्ट्रांमध्ये ही प्रक्रिया आहे, परंतु भारतात त्यासंदर्भात जनजागृती होणे अजूनही गरजेचे आहे.

डॉ. व्यास यांनी गेल्या अनेक वर्षांमध्ये मुंबईतील नामांकित हॉस्पिटल्समध्ये वैद्यकीय सेवा दिली आहे. लैंगिक समस्यांवर मार्गदर्शन देऊन त्यासंदर्भात समाजात एक मुक्त चर्चा घडवून आणण्याच्या दृष्टीने डॉ. प्रभू व्यास यांचे चांगले कार्य आहे. त्यांनी स्वतः १२६ वेळा रक्तदान केलेले आहे. डॉ. व्यास यांच्यामुळे अनेक कुटुंबांमधील लैंगिक समस्यांचे निराकरण झाल्याने पुढे त्यांचे संसार सावरले गेलेले आहेत. ते आजही अनेक ठिकाणी कार्यक्रमांमध्ये किंवा व्याख्यानांच्या माध्यमातून यासंदर्भात जनजागृती करीत आहेत, तसेच व्हिडिओ कन्सल्टेशनच्या माध्यमातून ते लैंगिक समस्यांसंदर्भात मार्गदर्शन पण देत असतात.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR
आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com
Call Now ७२७६३१४१४२

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
वार्ताहर नेमणे आहे
पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.
सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व आरंभपर्व
पुणे जिल्हा
इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर,जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर
पुणे शहर
धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा
इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.
aparvinfo@gmail.com
वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा
आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक
(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)
दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

# वासनांध अपप्रवृत्तींना पायबंद घालावाच लागेल



पुण्यातील स्वारगेट एसटी स्थानकातील २६ वर्षीय युवतीवरील अत्याचाराच्या घटनेने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात खळबळ उडाली आहे. मुळात साडेपाच वाजता ही घटना एसटी स्थानक आवारातील उभ्या असलेल्या बसमध्ये घडत असताना तेथील सुरक्षा यंत्रणा काय करत होती? यावरही आता प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पहाटे एसटी पकडण्यासाठी २६ वर्षीय तरुणी एसटी स्थानकात येते काय, कोणीतरी भूलथापा मारून बंद असलेल्या बसमध्ये घेऊन जाते काय? बसमध्ये जाताच त्या महिलेवर अत्याचार करून तो नराधम त्या परिसरातून बिनधास्तपणे निघून जातो काय? या सर्वच घटना अविश्वसनीय असून मनामध्ये संताप निर्माण करणाऱ्या आहेत. त्याहून संतापजनक बाब म्हणजे त्या भागातील राजकीय नेतृत्व असलेल्या वसंत मोरे यांनी तेथे तोडफोड केल्यावर एसटी स्थानक आवारात बस असलेल्या बसेसची पाहणी केल्यावर त्यात कंडोम व अन्य साहित्य पडलेले पाहून डोके सुन्न होते. या तरुणीने पोलिसांमध्ये तक्रार करण्याचे धाडस दाखविले म्हणून ही घटना उजेडात आली आहे. अनेकदा इज्जतीच्या भीतीने, समाज काय म्हणेल, समाज कोणत्या नजरेने पाहील या भीतीने अत्याचार झालेल्या महिला, युवती, शालेय मुली या घटना कोणाला सांगत नाही? त्यातूनच या नराधमांचे फावते आणि अशा अमानुष घटनांवर पडदा पडला जातो व त्यातूनच त्यांचे धाडस वाढीला लागते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेची गंभीरपणे दखल घेत चौकशीचे आदेश दिल्याने या घटनेतील सत्य लवकरच उजेडात येईल. नराधम सापडेल, नराधमाला शिक्षाही होईल. पण काळ सोकावेल, याचे उत्तर कोणी देऊ शकेल काय? त्या पीडित युवतीला त्या धक्क्यातून आयुष्यभर सावरता येणार नाही. राज्य सरकारच्या एसटी स्थानकामध्ये महिला, मुली, युवती आता सुरक्षित राहिल्या नसल्याचा संदेश आता राज्याच्या कानाकोपऱ्यात गेला आहे. यातून राज्य सरकारची नाचक्की झाली असून राज्याची प्रतिमाही मलीन झाली आहे. या घटनेमुळे स्वारगेट एसटी स्थानकातील सुरक्षेबाबत टाहो फोडला जात असतानाच या प्रकरणात पोलिसांच्या निष्काळजीपणाचा कोणताही भाग नाही. पोलिसांनी वेळच्या वेळी गस्त घातली होती. मात्र एसटी महामंडळाने नियुक्त केलेली खासगी सुरक्षा यंत्रणा अपयशी ठरल्याचे उघड झाले आहे. तपासादरम्यान समोर आले की, घटनेच्या दिवशी रात्री १२ ते पहाटे ६ या वेळेत पोलिसांनी दोन वेळा गस्त घातली होती. रात्री १:३० वाजता आणि पुन्हा पहाटे ३ वाजता पोलीस निरीक्षकांनी बसस्थानकावर गस्त घातली होती. ही सर्व बाब सीसीटीव्ही फूटेजमध्ये स्पष्ट दिसून येते. त्यामुळे पोलिसांनी आपले कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडले आहे, असे राज्य सरकारकडून सांगण्यात येत आहे.

एसटी महामंडळाने एका खासगी सुरक्षा




एजन्सीला हे काम सोपवले होते; परंतु त्या एजन्सीच्या सुरक्षारक्षकांनी आपली जबाबदारी योग्यरित्या पार पाडली नाही. जर त्यांनी जागरूकता दाखवली असती, तर ही घटना टाळता आली असती; परंतु खासगी एजन्सीवर घडल्या घटनेचे खापर फोडून राज्य सरकारला आपली जबाबदारी झटकता येणार नाही. कारण खासगी सुरक्षा यंत्रणा योग्य प्रकारे काम करतेय का, याची जबाबदारी डेपो व्यवस्थापकावर होती. मात्र, त्यांनी हे काम योग्य प्रकारे पाहिले नाही. त्यामुळेच या घटनेला वाव मिळाला. घटनास्थळी १०-१५ लोक उपस्थित होते, पण कुणालाही संशय आला नाही. त्यामुळेच आरोपीने गुन्हा केला. या घटनेला पोलिसांनी दुर्लक्ष केलेले नाही. पोलिसांची जबाबदारी वेगळी आहे आणि एसटी स्टँड परिसराची सुरक्षा एसटी महामंडळ आणि खासगी सुरक्षा यंत्रणेवर अवलंबून आहे. त्यामुळे घडल्या घटनेबाबत सरकार पोलिसांची बाजू घेत असले तरी एसटी डेपो कर्मचारी ही राज्य सरकारच्या अखत्यारीतील बाब आहे. घटना घडल्यावर राज्य सरकार व गृह यंत्रणेकडून कमालीची सतर्कता दाखविली जात असली तरी ही सतर्कता यापूर्वीच दाखविली असती, तर अशा अमानुष घटना करण्याचे नराधमांचे धाडसच झाले नसते. एसटी स्थानकात उभ्या असलेल्या शिवशाहीतला आरोपी सराईत गुन्हेगार होता, त्याच्यावर याआधी अनेक गुन्हे दाखल असून तो सध्या जामिनावर आहे. त्याचा शोध घेण्याकरता पुणे पोलिसांनी १ लाखांचेही बक्षीस जाहीर केले असून त्याच्या कुटुंबीयांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. या प्रकरणात स्वारगेट स्थानकात तैनात असलेल्या २३ सुरक्षा रक्षकांचे निलंबन करण्यात आले आहे. २०२० मध्ये या नराधमाने करे घाटात लूटमार केली होती. दरोड्या प्रकरणी त्याला शिक्षाही झाली होती. त्याच्यावर शिक्रापूरमध्ये दोन, अहिल्यानगरमध्ये सुपा, केडगाव आणि कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले आहेत. घटना घडल्यावर राजकीय घटकांनी ज्यावेळी एसटी स्थानकामध्ये तोडफोड केली, त्यावेळी एसटी स्थानकामध्ये बसेसजवळ सुरक्षा रक्षकांच्या केबिनबाहेर, स्वारगेट बसस्थानक परिसरात शेकडो कंडोम पडलेले निदर्शनास आले. मग इथे सुरक्षा रक्षकांची केबिन कशाला आहे, याबाबतही जनसामान्यांमध्ये संताप व्यक्त करण्यात येत आहे. विशेष म्हणजे युवतीवर अत्याचार करून नराधम आपल्या गावी गेला, गावी जाऊन कीर्तनात सहभागी झाला, दुपारनंतर घटना, आरोपीचे नाव आणि फोटो प्रसिद्धीस येऊ लागल्यावर त्या नराधमाने गावातून पलायन केले. नराधम किती निर्ढावलेला आहे, हे यातून दिसून येत आहे. केलेल्या कृत्याबाबत नराधमाला कोणताही पश्चाताप नसून तो राजरोसपणे काही वेळ सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये, जनसामान्यांमध्ये वावरत होता. त्यामुळे अशा निर्ढावलेल्या अपप्रवृत्ती जनसामान्यांमध्ये मोकळेपणाने फिरणे हे प्रचलित समाजव्यवस्थेसाठी घातक असून महिला, मुली यांच्यासाठी ती धोकादायक बाब आहे. या गुन्हेगारांचा तातडीने शोध लावून त्यास फासावर चढविणेच संयक्तिक ठरणार आहे.अशा नराधमांना कठोर शासन केल्याशिवाय अशा घटनांना पायबंद लागणार नाही व नराधमांनाही वेसन बसणार नाही. घडल्या घटनेने बस स्थानकातील सुरक्षेचे धिंडवडे निघाले असले तरी युवतीनेदेखील अनोळखी व्यक्तीच्या संभाषणावर विश्वास ठेवणे चुकीचेच होते. या चुकीची तिलाही फार मोठी किंमत चुकवावी लागली आहे.

घडली घटना समाजव्यवस्थेसाठी कलंक आहे. एसटी स्थानके रात्री , अपरात्री, पहाटे उजेडी महिलांसाठी, मुलींसाठी सुरक्षित नसल्याचे चित्र या घटनेतून निर्माण झाले आहे. नराधमाला धडा शिकवावा लागेल. सर्वसामान्य जनतेनेही यापुढे बघ्याच्या भूमिकेचा त्याग करून घडणाऱ्या घटनांबाबत जागरुकता दाखविली पाहिजे. स्थानकामध्ये असलेल्या १०-१५ जणांनी जरी मुलगी बंद गाडीकडे का जात आहे, याची उत्सुकता दाखवत मुलीसोबत गेले असते, तर कदाचित आज वेगळे चित्र पाहावयास मिळाले असते. घटना घडल्यावर हळहळ अथवा संताप व्यक्त न करता घटना घडण्यापूर्वी जागरुकता दाखविली, तर येत्या काळात संताप व्यक्त करण्याची वेळ कोणावरही येणार नाही.

# साधुसंतांच्या तत्त्वज्ञानातून धर्माचरण व मोक्षप्राप्तीचा बोध होतो

## ज्येष्ठ समाजसेवक प्रवचनकार डॉ. रवींद्र भोळे



**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

जगातील सर्व धर्मग्रंथ हे मनुष्य जातीच्या कल्याणासाठी असून साधुसंतांच्याद्वारे ह्या ग्रंथातील तत्त्वज्ञानाचा प्रसार होत असतो. कोणताही धर्म हा अधर्म करा, अन्याय करा, अनितीने वागा अशी शिकवत देत नाही. आहार, विहार, आचार, विचार याचे ज्ञान गीतेतून दिले जाते. साधुसंतांच्या तत्त्वज्ञानातून धर्माचरण व मोक्षप्राप्तीचा बोध होतो, असे मत ज्येष्ठ समाजसेवक प्रवचनकार डॉ.रवींद्र भोळे येथे व्यक्त केले. येथे ह भ प शांताराम गिरी महाराज यांच्या प्रेरणेने महाशिवरात्रीच्या अमृत योगा निमित्ताने महाशिवरात्रि सोहळा व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा, अखंड हरिनाम कार्यक्रमाचे आयोजना येथे करण्यात आले होते. याप्रसंगी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध समाजसेवक, प्रवचनकार डॉ. रवींद्र भोळे (दिल्ली हिंदू रत्न पुरस्कार विजेते) यांनी प्रवचनात वरील मत व्यक्त केले. याप्रसंगी अनेक मान्यवर साधू संतांची कीर्तने प्रवचने झाली. प्रामुख्याने तानाजी महाराज खेडेकर गुरोळी, बाळासाहेब महाराज गायकवाड वाघापूर, हिंदू रत्न डॉ. रवींद्र भोळे ज्येष्ठ समाजसेवक , प्रवचनकार उरुळी कांचन, महादेव महाराज खराडे, केरुजी महाराज चव्हाण, मुक्ताबाई के चव्हाण महाराज, वच्छला ताई मोडक, वडकी पुणे यांची प्रवचने झाली. त्याचप्रमाणे चौरे महाराज भांबुर्डे, आखाडे महाराज कासुर्डी, गोरख महाराज सुतार आंबी, मोहिनी ताई मुळीक बारामतीकर, कन्हैयालाल महाराज आळंदी, आकाश गवते महाराज आळंदी, अलकाताई वाल्हेकर नसरापूर, चैतन्य महाराज शिंदे लोणी काळभोर, यांची कीर्तने झाली. याप्रसंगी, दत्तात्रय बबन खेडेकर, पांडुरंग विनायक खेडेकर, परशुराम साहेबराव खेडेकर उपसरपंच, बापू मार्तंड खेडेकर, रामचंद्र यशवंत खेडेकर गुरुजी, दीपक सदाशिव खेडेकर, बबन नामदेव खेडेकर, मानसिंग भागवत खेडेकर, अरुण महाडिक शिक्षक, वाल्मीक भांडवलकर तलाठी कार्यालय वाघापूर गुरोली, बाळासो सिताराम खेडेकर, नवलू काळे, कांताराम महाराज खेडेकर, यास अनेक मान्यवर उपस्थित होते. समस्त ग्रामस्थ भजनी मंडळ गुरूळी तसेच आयोजक, निमंत्रक, तबलावादक पेटी वादक तसेच टाळेकरी विणेकरी , पंचक्रोशीतील अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन कैलास मठ, शिव मंदिर येथे करण्यात आले होते.

# थोडक्यात



## आनंदीबाई कर्वे प्राथमिक शाळेमध्ये मराठी गौरव दिन साजरा

**कर्वेनगर (आरंभ पर्व) : दि. २७ फेब्रु. २०२५ रोजी आनंदीबाई कर्वे प्राथमिक शाळेत "मराठी राजभाषा गौरव दिन" साजरा करण्यात आला. मा. मुख्याध्यापिका सौ. सुनंदाताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या दिनानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून मा. सौ. स्मिताताई देशपांडे उपस्थित होत्या. जेष्ठ शिक्षिका मा. छाया आबणावे यांनी प्रास्ताविक केले यानंतर विद्यार्थिनींनी मराठी दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. प्रमुख पाहुणे मा. स्मिताताई देशपांडे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी इयत्ता १ ली ते ७ वी पर्यंतचे सर्व विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री अनिकेत जगदीश तिजारे यांनी केले.**



## चक्रेश्वर महादेव मंदिरात ॲड प्रसन्नदादा जगताप यांच्याकडून अभिषेक

**पुणे (आरंभ पर्व) : हिंगणे खुर्द, सिंहगड रोड येथील महादेव नगरमधील प्रसिद्ध पुरातन चक्रेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्रीचे औचित्य साधून माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप आणि मित्रपरिवाराने सामूहिक दर्शन घेतले आणि अभिषेक केला. सालाबाद प्रमाणे याही वर्षी त्यांनी दर्शन घेऊन विधीवत अभिषेक केला. यावेळी मंदिराचे पुजारी अशोक सुंदरराव खरात यांच्या उपस्थितीत हा विधी पार पडला. हिंगणे येथील हे मंदिर प्राचीन असून त्याची देखभाल व व्यवस्थापन मंदिराचे विश्वस्त संजय नारायणराव जगताप करतात. ह्या अभिषेक प्रसंगी माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप,रमेशजी थेऊरकर, प्रकाशजी काळे, अनिलजी गोरे, तुकारामजी घोरपडे, अमनराज, किशोरजी कुलकर्णी, गणेशजी जगताप, चेतनजी धारवडकर, दत्तात्रयजी पोकळे, प्रसादजी जिजरे आदी मान्यवरांसह अनेक कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते. उपस्थित नागरिकांना ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी शिवरात्रीनिमित्त शुभेच्छा दिल्या.**

## स्वारगेट बस स्थानकावर झालेला तरुणीचा बलात्कार अत्यंत निषेधार्ह!!

**● अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेकडून निषेध व्यक्त**

**पुणे (आरंभ पर्व) : दिनांक २५ फेब्रुवारी २०२५ रोजी स्वारगेट बस स्थानकावर सकाळी ५:३० च्या सुमारास एका तरुणीवर बलात्कार झाला. ही घटना अतिशय निंदनीय आहे. स्वारगेट बसस्थानक हे एक सार्वजनिक ठिकाण आहे. या ठिकाणी सतत लोकांची वर्दळ असते. पुण्यात अनेक विद्यार्थी विद्यार्थिनी शिक्षणासाठी येतात. अशा गोष्टींमुळे त्यांच्या सुरक्षेवरती मोठे प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. या घटनेच्या विरोधात आज अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने तीव्र स्वरूपात निषेध व्यक्त केला आहे. यावेळी बोलताना 'स्वारगेट सारख्या वर्दळीच्या परिसरात अशी घटना घडणे हे अत्यंत निंदनीय आहे. यावेळी प्रशासन काय करत होते? या घटनेमुळे विद्यार्थिनींच्या सुरक्षेवर प्रश्न उपस्थित होत आहे. प्रशासनाने यावर योग्य ती कारवाई त्वरित करावी.' असे मत पुणे महानगर सहमंत्री भूमिका कानडे यांनी मांडले.**

# 'पुणे कॉमिक कॉन २०२५' निमित्त आयोजित 'कार्यशाळे'ने दिली अप्रतिम मेजवानी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

'मारुती सुझुकी अरेना पुणे कॉमिक कॉन २०२५'ची पूर्वतयारी म्हणून 'क्रंचीरोल यांच्या संयुक्त विद्यमाने' आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक कॉसप्ले कार्यशाळेमध्ये सर्जनशीलता, आवड आणि कौशल्याची अप्रतिम मेजवानी अनुभवायला मिळाली. रविवार १६ फेब्रुवारी रोजी पुण्यातील बाणेर येथील काला कॅफे अँड को-वर्क्समध्ये पार पडलेल्या या कार्यक्रमात विविध स्तरातील कोसप्लेयर्स आणि चाहत्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. २०२४ चे इंडियन कोसप्ले स्पर्धेचे विजेते आणि प्रसिद्ध कॉसप्ले स्टुडिओचे संस्थापक सौरभ सिंग रावत, तीन वेळा इंडियन कोसप्ले स्पर्धेसाठी



पात्र ठरलेले आणि आपल्या फोम आधारित पोशाख बनविण्याच्या कलेने तब्बल १७ कोसप्ले स्पर्धेचे विजेते राहिलेले शेख समीर कलीम व सर्जनशील कलाकृतीमध्ये आणि कोसप्लेमध्ये आवड असणाऱ्या उत्कृष्ट कॉसप्लेयर स्वाती मेस्त्री हे या कार्यशाळेचे यजमान होते. या तिघांनी मिळून परस्परसंवाद सत्र घेत इच्छुक कॉसप्लेयर्सना या कलेबाबत प्रेरणा दिली.

# एटीएम फोडुन जवळपास सहा लाख रुपये केले लंपास

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

अज्ञात दोन चोरट्यांनी एटीएम फोडून जवळपास सहा लाख रुपयांची रोख रक्कम लंपास केल्याची घटना सोरतापवाडी (ता. हवेली) हद्दीत घडली आहे . इंडियन ओव्हरसीज बँकेचे एटीएम गुरुवारी (ता. २७ ) रोजी पहाटे साडेतीन वाजण्याच्या सुमारास फोडले.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मध्यरात्रीच्या सुमारास दोन अज्ञात चोरटे एटीएम सेंटरमध्ये घुसले. गॅस कटरच्या मदतीने त्यांनी मशीन फोडली आणि त्यातील रक्कम घेऊन पसार झाले. हा प्रकार पहाटे उघडकीस आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच उरुळी कांचन पोलीस तात्काळ




दाखल झाले. पोलिसांनी सीसीटीव्ही फूटेज तपासणीसाठी घेतले असून चोरट्यांचा शोध सुरू आहे.

दरम्यान या भागात यापूर्वीही एटीएम फोडण्याच्या घटना घडल्या असून, सुरक्षेच्या उपाययोजनांबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. यावेळी

अप्पर पोलीस अधीक्षक बारामती गणेश बिरादार, पोलीस उप अधीक्षक बापूसाहेब दडस, उरुळी कांचन पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शंकर पाटील, यवत पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण देशमुख यांनी घटनास्थळाची पाहणी केली व पुढील सुचना दिल्या पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक प्रविण कांबळे करत आहेत.

एटीएमची सुरक्षा बेभरवशावर असुन क्वचितच सुरक्षा रक्षक दिसत आहेत.

# राजगुरू महाविद्यालयात 'माय मराठी'चा जागर

**किरण खुडे**

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त मराठी भाषा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने विविध विषयांवर व्याख्याने आवडत्या पुस्तकाचा परिचय, निबंध स्पर्धा, काव्यवाचन इत्यादी उपक्रम राबविण्यात येऊन मायमराठीचा गजर करण्यात आला. कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे यांनी अभिवादन केले. या प्रसंगी उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय शिंदे, प्रा. डी.एन. बिराडे, डॉ.डी.एम.मारकड, प्रा. एम.एल.मुळूक, डॉ. योगेश वाळुंज, प्रा.एस.आर.थोरात, प्रा. रौनक भिसे, प्रा. रोहिणी पाटोळे उपस्थित होत्या.




**● राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त अभिवादन करताना प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे व विद्यार्थी. (छायाचित्र : किरण खुडे, राजगुरुनगर) ●**

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे म्हणाले की, मराठी भाषा गौरव दिन म्हणजे आपल्या मायबोलीचा सन्मान करण्याचा आणि समृद्ध वाटचालीला उजाळा देण्याचा दिवस आहे. स्वतःची भाषा विकसित करा, चांगले मराठी प्रयत्नपूर्वक ऐका असे त्यांनी विद्यार्थ्यांना आवाहन केले.

डॉ. संजय शिंदे यांनी महाराष्ट्रातील सांस्कृतिक वारसा पुढे नेणाऱ्या कुसुमाग्रजांच्या साहित्यिक योगदानाचा आढावा घेतला. त्यांची कविता काळाशी लढण्याचे बळ देते, असे ते म्हणाले. प्रा. रौनक भिसे यांनी मराठी भाषा आणि करिअरच्या संधी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

किरण भोगाडे, शुभम गायकवाड, श्रद्धा पोखरकर, प्रणव टिमुने, जयेश सुत्रे या विद्यार्थ्यांनी आवडत्या पुस्तकांचा परिचय करून दिला. 'लाभले आम्हास भाग्य, बोलतो मराठी' या गीताचे सामूहिक गायन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन डॉ. संजय शिंदे यांनी केले.

# श्री. सुमन कुमार यांनी इंडियन ऑइलच्या संचालक पदाचा कारभार स्वीकारला

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

श्री.सुमन कुमार यांनी इंडियन ऑइलच्या नियोजन आणि व्यावसायिक विकास विभागाचे संचालक म्हणून पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी ते कॉर्पोरेट ऑफिसमध्ये अन्वेषण आणि उत्पादन विभागाचे कार्यकारी संचालक म्हणून कार्यभार पाहत होते.

३० वर्षाहून अधिक काळाचा अनुभव असलेले कुमार हे अनुभवी व्यावसायिक आहेत. त्यांनी नैसर्गिक वायू, पेट्रोकेमिकल्स, शहरांतर्गत गॅसचे वितरण,अक्षय ऊर्जा व्यवसायाच्या विस्तारात मोलाची भूमिका बजावली आहे. ते एमआयटी मुजफ्फरपूर येथून मेकॅनिकल इंजिनीरिंगचे पदवीधर असून, त्यांनी एमबीए केलेले आहे. तसेच उच्च व्यवस्थापन प्रशिक्षण पूर्ण केले आहे. कुमार यांनी एलपीजी ऑपरेशन्स, पेट्रोलियम उत्पादन



विक्री, ऊर्जा संवर्धन आणि कार्बन उत्सर्जन कमी करणे यांसारख्या क्षेत्रांमध्ये महत्वपूर्ण जबाबदाऱ्या सांभाळत नेतृत्व केले आहे.

श्री. सुमन कुमार आता आपल्या नव्या पदभारांतर्गत इंडियनऑइलच्या विस्तारीत व्यवसाय श्रेणीचे नेतृत्व करणार असून, यात पेट्रोकेमिकल्स, नैसर्गिक वायू, अन्वेषण आणि उत्पादन, हरित ऊर्जा, व्यवसाय विविधीकरण उपक्रम आणि औद्योगिक स्फोटके यांचा समावेश असेल.

## थोडक्यात



### सज्जन जिंदाल यांना 'दशकातील सर्वोत्कृष्ट व्यवसाय अग्रणी' पुरस्कार प्रदान

बारामती (आरंभ पर्व) : JSW ग्रुपचे अध्यक्ष सज्जन जिंदाल यांना 15 व्या AIMA मॅनेजिंग इंडिया अवॉर्ड्समध्ये प्रतिष्ठेच्या 'दशकातील सर्वोत्कृष्ट व्यवसाय अग्रणी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा पुरस्कार म्हणजे JSW समूहाला जागतिक स्तरावरील मोठ्या उद्योग समूहामध्ये विस्तारण्याच्या त्यांच्या परिवर्तनात्मक नेतृत्वाला मिळालेली मान्यता आहे. आज झालेल्या समारंभात श्री. जिंदाल यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी मुख्य अतिथी म्हणून केंद्रीय शिक्षण मंत्री श्री. धर्मेंद्र प्रधान आणि सन्माननीय अतिथी म्हणून वाणिज्य आणि उद्योग; इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी विभागाचे राज्यमंत्री श्री. जितिन प्रसाद उपस्थित होते. पुरस्काराच्या सन्मानपत्राचे वाचन केपीएमजी इंडिया चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. यझदी नागपोरेवाला यांनी केले. श्री. जिंदाल यांच्या नेतृत्वाखाली JSW समूहाने उल्लेखनीय वाढ साध्य केली असून कंपनीचे उत्पन्न दुपटीहून अधिक वाढून 24 अब्ज अमेरिकन डॉलरवर पोहोचले आहे. त्यांच्या धोरणात्मक दृष्टिकोनामुळे JSW ने वार्षिक स्टील उत्पादन क्षमता जवळपास तिप्पट करून 39 दशलक्ष टनांपर्यंत वाढवली आहे. तसेच, JSW ने अक्षय ऊर्जा आणि सिमेंट उत्पादन क्षेत्रात महत्त्वपूर्ण स्थान निर्माण केले आहे.



### स्फूर्तिगीतातून भाजपाचे संघटन वाढीचे प्रयत्न

मुंबई (आरंभ पर्व) : भारतीय जनता पार्टीचं महाराष्ट्रात सध्या संघटन पर्व सुरु आहे ज्यामध्ये दीड कोटी सदस्य बनविण्याचे पक्षाने उद्दिष्ट ठेवले असून विविध माध्यमांतून महाराष्ट्रातील जनतेला भाजपाची विचारधारा पोहोचवून पक्षाकडे आकर्षित करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे, त्याचाच एक भाग म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या संकल्पनेतून भाजपा स्फूर्तिगीत तयार करण्यात आले आहे. या ऊर्जादायी गाण्याचे विमोचन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते मुंबई येथील सदस्यता महा अभियान २०२५ अंतर्गत आयोजित संघटन पर्व कार्यशाळा या भव्य कार्यक्रमात करण्यात आले. भारतीय जनता पार्टी जगातील सर्वात मोठा राजकीय पक्ष असून सर्वप्रथम राष्ट्र नंतर पक्ष व शेवटी स्वतः ही भारतीय जनता पार्टीची विचारधारा सामान्य लोकांपर्यंत पोहचावी आणि देशाचे लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदीजी व महाराष्ट्रात मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील पक्षाला कार्यकर्त्यांचे अधिकाधिक बळ देण्यासाठी पक्ष संघटना मजबूत करण्याचं काम भाजपा करत आहे. भाजपा पक्ष देशाला विकासाची दिशा देण्याचं काम करत आहे त्यामुळे त्यात जास्तीतजास्त लोक जोडून यावेत यासाठी स्फूर्तिगीताची कल्पना राबविण्याचा निर्णय घेतल्याचे प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले. संकल्पनेतील उज्ज्वल भारतासाठीचे भाजपाचे ध्येय, कार्यशैली, लोकनेते तसेच कार्यकर्त्यांची एकनिष्ठता आणि त्यांचे पक्षाप्रती असलेले समर्पण यांचे छान शब्दात वर्णन आणि चित्रिकरण करण्याचा प्रयत्न या प्रेरणादायी गाण्यातून मांडण्याचा प्रयत्न भाजपाने केला असून या गाण्यातून अनेक सभांच्या माध्यमातून आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून सर्व कार्यकर्त्यांना नक्कीच आपल्या पक्षाप्रती आदर वाढेल आणि प्रेरणा मिळेल असा विश्वास कार्याध्यक्ष चव्हाण यांनी व्यक्त केला.

# वृक्षसंवर्धनासाठी दोडके सरसावले

## झाडांसाठी महानगरपालिकेने पाण्याची सोय करण्याची मागणी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
कार्यतत्पर नगरसेवक म्हणून ओळख असलेले मा. नगरसेवक सचिन दोडके वृक्ष संवर्धनासाठी पुढे सरसावले आहेत. पुणे महानगरपालिकेने वारजे माळवाडी येथील गणपती माथा ते शिंदे पुल दरम्यान विविध स्वरूपाची झाडे लावली होती. मात्र ही लावलेली झाडे पाण्याच्या अभावी जळण्याच्या अवस्थेत होती. ही बाब लक्षात घेता सचिन दोडके पुणे महानगर पालिकेच्या उद्यान विभागाशी संपर्क साधून सदर वस्तुस्थितीची माहिती दिली. ह्यावेळी पुणे महानगरपालिकेच्या उद्यान विभागाच्या अधिकारी श्रीमती सिन्हा यांनी झाडे लावलेल्या मार्गावर भेट दिली.दोडके यांच्यासोबत पाहणी केली. व वस्तुस्थिती जाणून घेतली. सद्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने झाडांना देखील पाण्याची निकडीची गरज आहे.यावर उपाय करण्यात यावा. व झाडांना पाण्याची सोय करण्यात यावी अशी मागणी श्री . दोडके यांनी उद्यान विभागाच्या सिन्हा मॅडम यांच्याकडे केली. यावर उपाययोजना म्हणून लवकरच येथील झाडांना पाणी सुरू करण्यात येणार आहे. वृक्ष संवर्धनासाठी आवश्यक ते प्रयत्न नक्की केले जातील असे सिन्हा यांनी यावेळी सांगितले. आपला परिसर अधिकाधिक समृद्ध कसा होईल यावर आपण कायमच भर दिला आहे. इथून पुढच्या काळात देखील पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आपण कार्य करणारं आहोत. असेही दोडके यांनी दै.आरंभपर्वशी बोलताना सांगितले. यावेळी इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## प्रधान आयकर आयुक्त- २, पुणे आणि डिवाइन जैन ग्रुप ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिर




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
"रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. हेच मानवसेवा आणि हेच ईश्वरसेवा आहे," या उद्देशाने प्रधान मुख्य आयकर आयुक्त, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रधान आयकर आयुक्त- 2, पुणे आणि डिवाइन जैन ग्रुप ट्रस्ट यांच्या संयोजनाने दि. 21 रोजी आयकर कार्यालय, पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपकांत प्रसाद (प्रधान आयकर आयुक्त-2), पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की, "माणसाने केलेले रक्तदान एखाद्या गरजू व्यक्तीचे प्राण वाचवते, आणि रक्तदात्यासाठी याहून मोठी समाधानाची गोष्ट असू शकत नाही." या रक्तदान शिबिरात ८१ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमात संग्राम गायकवाड (प्रधान आयकर आयुक्त-1, पुणे), ॲन कपथुआमा (प्रधान आयकर आयुक्त-3, पुणे) आणि नवीन गुप्ता (प्रधान आयकर आयुक्त - Exemption , पुणे) हे कार्यक्रमाचे मान्यवर अतिथी होते. रक्तदान शिबिराचे समन्वयन नेहा देशपांडे (संयुक्त आयकर आयुक्त, रेंज-3, पुणे), श्रीकांत कुलकर्णी (सहायक आयकर आयुक्त, सर्कल-2, पुणे) आणि अरुण लेनका (आयकर अधिकारी, मुख्यालय-2, पुणे) डिवाईन जैन ग्रुप चे अध्यक्ष संकेत शहा, तिमिर संघवी यांच्या सहकार्याने हे रक्तदान शिबिर यशस्वीपणे पार पडले.

डिवाइन जैन ग्रुप ट्रस्टचे चेतन जैन, हर्षल नौलखा, भूषण कर्नावट, प्रियंका शहा, हार्दिक शहा, उत्तम धोका तसेच आयकर आयुक्त कार्यालयाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. त्यांच्या समर्पित प्रयत्नांमुळे हा उपक्रम यशस्वी ठरला.

## राज्यस्तरीय ऑनलाईन कविसंमेलन संपन्न




**ओतूर (दै. आरंभ पर्व)**
काव्यप्रेमी शिक्षक मंच पुणे आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे महाराज यांची संयुक्त जयंती तसेच जागतिक मराठी राजभाषा दिनानिमित्त राज्यस्तरीय ऑनलाईन कविसंमेलन व गझल मुशायरा वार बुधवार दि.२६/०२ ला गुगल मिटवर संपन्न झाला.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अक्कलकोटचे साहित्यिक तथा काव्यप्रेमी शिक्षक मंचचे राज्य कोषाध्यक्ष कृष्णा शिंदे सोलापूर त्यांनी भूषविले तर उदघाटन वर्षा भांदर्गे राज्यसदस्या अमरावती यांनी केले.प्रमुख उपस्थिती आनंद घोडके राज्याध्यक्ष,कालिदास चवडेकर राज्यसचिव,संदीप वाघोले राज्यसदस्य ,तंत्रसहाय्यक श्रीमंत कोळी उपस्थित होते.

यावेळी राज्यातून कवी व गझलकार म्हणून दीप्ती यादव रत्नागिरी,भोजराज लांजेवार नागपूर,अनिसा सिकंदर शेख दौंड,शोभा वागळे पुणे,सरिता कलढोणे जुन्नर,गजानन पाटील सांगली,जमालोद्दीन शेख अक्कलकोट,नागेश बोंतेवाड संभाजीनगर ,सुजाता भोजने,युवराज्ञी सोनवणे ओतूर इत्यादी कवींनी संत गाडगेबाबा ,छत्रपती शिवाजी महाराज,मराठी भाषेची थोरवी ,अशा सामाजिक भान जपणाऱ्या दर्जेदार कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे आयोजन व प्रास्ताविक पुणे जिल्हा अध्यक्ष रणजित पवार यांनी केले तर सूत्रसंचालन पुणे जिल्हा सहसचिव मनिषा खामकर यांनी केले.

## आश्रमशाळेतील विद्यार्थिनींना पाणी बॉटलचे वाटप



**ओतूर (दै. आरंभ पर्व)**
ओतूर येथील श्री गाडगे महाराज प्राथमिक/माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थिनींना नांदी फाऊंडेशन, पुणे यांच्यावतीने,मोफत पाणी बॉटलचे वितरण नुकतेच करण्यात आले.यासाठी नांदी फाऊंडेशनच्या प्रशिक्षिका शामल पानसरे यांचे सहकार्य लाभले.

यावेळी प्राथमिक आश्रमशाळेच्या मुख्याध्यापिका सुमन घाडगे,अधिक्षिका नीता पोहरकर उपस्थित होत्या.श्री गाडगे महाराज शैक्षणिक संकुल ओतूर येथील संचालक नितीन पाटील यांनी नांदी फाऊंडेशनचे आभार मानले.

याआधी सुद्धा फाऊंडेशनच्या वतीने, विद्यार्थिनींना मोफत सॅनिटरी पॅड,स्कुल बॅग व टि शर्टचे वाटप करण्यात आले होते. अशी माहिती मुख्याध्यापिका सुमन घाडगे यांनी सांगितली.

# शिवशाही बसमध्ये महिलेवर बलात्कार

**हर्षल कोठावदे**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
पुण्यात संतापजनक घटना घडली आहे. शिवशाही बसमध्ये २६ वर्षीय महिलेवर बलात्कार करण्यात आला आहे. पहाटे साडेपाच वाजता महिलेवर अत्याचार करण्यात आला. अंधाराचा फायदा घेत महिलेवर अतिप्रसंग करण्यात आला. पुण्यातून धक्कादायक बातमी समोर आली आहे, शिवशाही बसमध्ये महिलेवर बलात्कार करण्यात आल्याची संतापजनक घटना घडली आहे. २६ वर्षीय तरूणीवर स्वारगेट एसटी बस स्टँडमध्ये अभ्या असलेल्या शिवशाही बसमध्ये महिलेवर बलात्कार केल्याची घटना उघडकीस आली आहे. पहाटे अंधाराचा फायदा घेत नराधमाने महिलेवर बलात्कार केला अन् पळ काढला. पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे साडेपाच वाजता ही धक्कादायक घटना घडली. पोलीस स्टेशनमध्ये याबाबत तक्रार कऱण्यात आली आहे. पोलिसांची पथके आरोपीच्या मागावर आहेत. शिवशाही बसमध्ये बलात्कार झाल्याची घटना उघडकीस आल्यानंतर पुण्यात एकच खळबळ उडाली आहे. पुणे पोलिसांवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित कऱण्यात येत आहेत. पुण्यामध्ये आज पहाटे साडेपाच वाजता स्वारगेट बस स्टँडवर उभ्या असणाऱ्या शिवशाही बसमध्ये बलात्कार केल्याची धक्कादायक आणि संतापजनक घटना घडली आहे. महिला एकटीच असल्याचा फायदा घेत नराधमाने महिलेवर बलात्कार केला, त्यानंतर तेथून पळ काढला. या प्रकारानंतर पुण्यात एकच खळबळ उडाली आहे. पुणे पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. 26 वर्षाची तरुणी पुण्यातून फलटणच्या दिशेने निघाली होती. स्वारगेट एसटी स्टँडच्या परिसरात आल्यानंतर एका ठिकाणी ती थांबली होती. त्यावेळी एका अनोळखी व्यक्तीने तिला फलटणला जाणारी एसटी बस दुसऱ्या ठिकाणी थांबली असल्याचं सांगितलं. माझी एसटी याच ठिकाणी थांबते, तिकडे जाणार नाही असं त्या मुलीने त्याला सांगितलं. मात्र एकट्या मुलीचा फायदा घेत त्या तरुणाने तिला त्याच्या शब्दात अडकवले.

स्वारगेट एसटी स्टँड परिसरात असलेल्या एका अंधाराच्या ठिकाणी एक शिवशाही बस उभी होती. या ठिकाणी ती मुलगी गेल्यानंतर तिने ही एसटी तर बंद आहे असं देखील सांगितलं. तू टॉर्च लावून आत मध्ये जा हीच एसटी काही वेळात फलटणला निघेल, असं या नराधमाने तिला सांगितले आणि स्वतः सुद्धा बसमध्ये शिरला. त्याने तिच्यावर जबरदस्ती केली आणि त्यानंतर तो तिथून पसार झाला. घडलेला संपूर्ण प्रकार या मुलीने पोलिसांना सांगितलेला असून पोलिसांची विविध पथकाकडून आरोपीचा शोध घेतला जातोय.

# द इंडियन गॅरेज कंपनीचा ॲमनोरा येथील फ्लॅगशिप स्टोअरसह महाराष्ट्रात विस्तार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
भारतातील आघाडीच्या फास्ट फॅशन डी2सी ब्रँडस पैकी एक असलेल्या द इंडियन गॅरेज कंपनी ने ॲमनोरा मॉल येथे 1 आणि 2 मार्च 2025 रोजी नवीन फ्लॅगशिप स्टोअरच्या उद्‌घाटनाची घोषणा केली आहे. या स्टोअरचे उद्‌घाटन ॲमनोरा मॉलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरजित सिंग राजपुरोहित यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. हैदराबाद येथील सारथ सिटी मॉल येथील ब्रँडच्या घवघवीत यशानंतर द इंडियन गॅरेज कंपनी फॅशन चाहते असलेल्या जेन-झी ग्राहकांपर्यंत ट्रेंडी कलेक्शन पोहचवत महाराष्ट्रात आपली छाप पाडण्यास सज्ज झाले आहे.

**पुण्यातील लॉंच हे द इंडियन गॅरेज कंपनीच्या रिटेल विस्तार धोरणाचा एक भाग असून बँगलोर,त्रिवेंद्रम आणि इतर शहरात यापुढे स्टोअर्स सुरू केले जातील. ब्रँडचे विकास धोरण हे देशभरात रिटेल नेटवर्क प्रस्थापित करण्याच्या ध्येयाच्या केंद्रस्थानी असून भारतातील अधिकधिक ग्राहकांपर्यंत ट्रेंडी फॅशन याद्वारे उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. ब्रँडची उत्पादने TIGC.inया अधिकृत वेबसाईटद्वारे उपलब्ध आहे. तसेच मिंत्रा,आजिओ,ॲमेझॉन,फ्लिपकार्ट,स्नॅपडील आणि यु ए ई नून या प्रमुख ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म्सवर देखील उपलब्ध आहे. ब्रँडची भारतातील सुमारे 100 फॅशन फॅक्टरी स्टोअर्स मध्ये उपस्थित आहे.**

हा विस्तार साजरा करण्यासाठी ब्रँड तर्फे भारतातील सर्वांत मोठा फॅशन इव्हेंट म्हणजे फॅशन फ्रेंजी सेल हा पुण्यातील फॅशन चाहत्यांसाठी 48 तासांचा शॉपिंग महोत्सव आयोजित केला आहे. स्टोअरमधील प्रत्येक वस्तूची किंमत 799 रूपयांपेक्षा कमी असेल. यामध्ये 1500 पेक्षा अधिक स्टाईल्स,कोरियन प्रेरित व बोहेमियन कलेक्शनचा समावेश आहे.1 मार्च रोजी पहिल्या 100 प्रेक्षकांना रूपये 1000 पर्यंतच्या उत्पादनांची खरेदी मोफत मिळेल. हा रोमांचक सेल या हंगामातील व्हायरल फॅशन इव्हेंट बनेल,ज्यामध्ये विविध शैलींवर अतुलनीय डील्स मिळतील. 2051 चौरस फुटांवर विस्तारलेल्या ॲमनोरा मॉलमधील फ्लॅगशिप स्टोअर एक आकर्षक खरेदी अनुभव देईल. ज्यामुळे ग्राहकांना जेन-झी पिढीसाठी स्टाईलिश फॅशनचे विविध प्रकार उपलब्ध होतील. ट्रेंडी स्ट्रीट वेअर पासून ते रिसॉर्ट आणि बोहेमियन प्रेरित उत्पादनांपर्यंत हे स्टोअर पुण्यातील तरूण फॅशन जागरूक लोकांसाठी त्यांच्या विविध आवडी-निवडीनुसार डिझाईन केले गेले आहे.

द इंडियन गॅरेज कंपनीचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत तांतेड म्हणाले की, पुण्यामध्ये द इंडियन गॅरेज कंपनीचे स्टोअर सुरू करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. ॲमनोरामधील हे स्टोअर आमच्या विस्तार धोरणातील एक महत्त्वाचा टप्पा आहे आणि फॅशन जागरूक असलेल्या पुणेकरांपर्यंत आमचे स्टायलिश कलेक्शन आणण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत.पुण्यातील गतिमान उर्जेमुळे या नवीन स्टोअरसाठी हे शहर योग्य ठिकाण आहे.

हैदराबादमधील सारथ सिटी मॉलमध्ये यशस्वी पदार्पणासह द इंडियन गॅरेज कंपनीने चांगली गती प्राप्त केली असून शैली,गुणवत्ता आणि नाविन्यपूर्णतेचे खास मिश्रण पुण्यात आणण्यासाठी सज्ज आहे. आजच्या अत्याधुनिक जागरूक ग्राहकांना अनुरूप असा एक अनोखा खरेदीअनुभव देण्यासाठी ब्रँड वचनबध्द आहे.

स्टोअर लाँच साजरे करण्यासाठी द इंडियन गॅरेज कंपनी विशेष इन स्टोअर कलेक्शन्स आणि उद्‌घाटनपर ऑफर्स देखील देत आहेत.1 मार्च 2025 रोजी सकाळी 10.30 वाजता दरवाजे उघडतील,ग्राहकांची रांग सकाळी 10 वाजल्यापासूनच सुरू होईल.



## थोडक्यात



### महाशिवरात्री निमित्त ब्रह्माकुमारी तर्फे उभारली प्रतिकात्मक अमरनाथ गुफा

पुणे (आरंभ पर्व) : प्रजापिता ब्रह्माकुमारी इश्वरीय विश्व विद्यालय बाणेर तर्फे महाशिवरात्री निमित्त 72 फूट लांब परमेश्वरास पत्र लिहून इंडिया स्टार बुक ऑफ रिकॉर्ड्स मध्ये विक्रम नोंदविला आहे. या पत्रात प्रत्येकाने आपल्याला महादेव शंकर भगवानाबद्दल वाटणाऱ्या भावना लिहिल्या. तसेच ब्रह्माकुमारी तर्फे प्रतिकात्मक अमरनाथ गुफा उभारली होती जे मुख्य आकार्षण होते. स्मार्ट युगात पत्रव्यवहार प्रथा लूप्त पावत आहे म्हणून ही प्रथा अविरत रहावी म्हणून सरळ महाशिवरात्री महादेवासच पत्र लिहिण्याचा उपक्रम प्रजापिता ब्रह्माकुमारी इश्वरीय विश्व विद्यालयाने राबविला. याचा शुभारंभ विठ्ठल भरेकर उप-शिक्षण आधिकारी, वैशाली जाधव (ढोलकीच्या तालावर विजेती), प्रिती शिरोडे, डॉ.त्रिवेणी बहिरट (संचालिका, प्रजापिता ब्रह्माकुमारी इश्वरीय विश्व विद्यालय बाणेर), सोलोमन शेंडगे, संजय रायकर यांच्या उपस्थित करण्यात आला. तसेच घनशम रायकर, आमोल बालवडकर (मा.नगरसेवक), दिलीप मुरकुटे यांनी या उपक्रमांस भेट दिली. तसेच प्रजापिता ब्रह्माकुमारी इश्वरीय विश्व विद्यालय बाणेर येथे 10 फुट उंच आणि 20 फुट प्रतिकात्मक अमरनाथ गुफा उभारण्यात आली. या गुफेत शिवलिंग, शंकर भगवान आणि आकर्षक विद्यत रोषणाई करण्यात आली आहे. तसेच सोमनाथ, महाकालेश्वर, केदारनाथ, भीमाशंकर, विश्वनाथ सह भारतात असलेले 12 ज्योतिर्लिंगाचे पोस्टर ही येथे लावण्यात आलें होते. यावेळी येणाऱ्या भक्ताला खोल आध्यात्मिक शांती आणि ध्यानाचा अनुभव ही दिला जात होता. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय बाणेर येथे महाशिवरात्री महोत्सव अंतर्गत बनविलेली गुफा पाहण्याची संधी रायकर फार्म हाऊस, बाणेर, पुणे येथे सकाळी 8:00 ते रात्री 8:00 वाजेपर्यंत 28 फेब्रुवारी पर्यंत पाहण्यास उपलब्ध असणार आहे. याचा लाभ संर्वांनी घ्यावा असे आवाहन डॉ.त्रिवेणी बहिरट (संचालिका, प्रजापिता ब्रह्माकुमारी इश्वरीय विश्व विद्यालय बाणेर) यांनी यावेळी केले.

### लोणी काळभोर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भरत काळभोर यांची निवड



लोणी काळभोर (आरंभ पर्व) : लोणी काळभोर ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी भरत दत्तात्रय काळभोर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यावेळी झालेल्या सत्कार समारंभा वेळी नवनिर्वाचित सरपंच भरत काळभोर यांनी सांगितले की लोणी काळभोर ग्रामपंचायत ही पुणे जिल्ह्यात एक नंबरची ग्रामपंचायत होण्यासाठी प्रयत्न करणार असुन विकासकामे करताना ज्येष्ठांचे मार्गदर्शन व ग्रामपंचायत मधील सहकाऱ्यांना बरोबर घेऊन ग्रामपंचायतीचा विकास करणार आहे .विकास कामात कुठल्याही प्रकारचे राजकारण न करता विकास कामे चालू राहणार आहेत .लवकरच लोणी काळभोरची जलजीवन योजना मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तरुण , अभ्यासू ,होतकरू असे सरपंच लाभल्याने लोणी काळभोर गावात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण झाले . मावळत्या सरपंच सविता गीताराम लांडगे यांनी राजीनामा दिल्यामुळे ही निवडणुक घेण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा मंडल अधिकारी अशोक शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली. ग्रामविकास अधिकारी एस. एन. गवारी यांनी निवडणुक कामकाजात सहकार्य केले. सरपंचपदासाठी भरत काळभोर यांचा एकमेव अर्ज आल्याने निवडणूक निर्णय अधिकारी अशोक शिंदे यांनी त्यांची सरपंचपदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली. यावेळी ज्येष्ठ नेते माधव काळभोर यांच्या हस्ते नवनिर्वाचित सरपंच भरत काळभोर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी साधना सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष सुभाष काळभोर, माजी जिल्हा परिषद सदस्य विलास काळभोर, पंचायत समिती माजी सभापती युगंधर उर्फ सनी काळभोर बाजार समितीचे माजी संचालक शिवदास काळभोर, माजी सरपंच शरद काळभोर, योगेश काळभोर ,भोलेनाथ शेलार , माधुरी काळभोर ,उपसरपंच रतन वाळके, माजी उपसरपंच ज्योती काळभोर, संगीता काळभोर, सदस्य नागेश काळभोर ,गणेश कांबळे ,संजय राखपसरे उपस्थित होते.

# २९ हजार माथाडी कामगारांच्या हाती 'कमळ'!

## भाजप प्रदेश कार्याध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात इनकमिंग सुरू

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्र प्रथम' ही भावनासमोर ठेवून राष्ट्रहित जोपासणारा पक्ष म्हणजे 'भारतीय जनता पक्ष'. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार आणि महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील भाजप-महायुती सरकार कामगारांच्या कल्याणासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत आणि त्यामुळे राष्ट्राची वाटचाल विकसित भारताकडे होत आहे. देशाचा विकास करणारा एकमेव पक्ष म्हणजे भाजप हे आता देशातील नागरिकांना कळायला लागले आहे त्यामुळे 'भाजप'मध्ये मोठ्या प्रमाणात इतर पक्षांमधून पदाधिकारी, कार्यकर्ते प्रवेश करत आहेत आणि पक्षात



प्रवेशाचा ओघ वाढत आहे. नुकतेच मुंबईतील भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यालयात संजय (बापू) निकम आणि पोपटराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली 'माथाडी कामगार युनियन'च्या तब्बल २९ हजार माथाडी कामगारांनी प्रवेश केला.

हा पक्षप्रवेश 'भाजप' प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, 'भाजप'चे कार्यकारी अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. यावेळी रविंद्र चव्हाण यांनी पक्षात प्रवेश करणाऱ्यांचे स्वागत करत त्यांच्या भावी सामाजिक आणि राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

एवढ्या मोठ्या प्रमाणात 'भाजप'मध्ये होणारा पक्षप्रवेश पाहता रविंद्र चव्हाण यांनी भाजप पक्ष वाढ आणि पक्ष विस्तारासाठी जोरदार हालचाली सुरू केल्या असल्याचे या माध्यमातून स्पष्ट होत आहे. या अनुषंगाने चव्हाण यांची महाराष्ट्र राज्य माथाडी ट्रान्सपोर्ट सुरक्षा रक्षक आणि जनरल कामगार संघटनेचे नेते संजय (बापू) निकम आणि पोपटराव पाटील यांच्याशी गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरू होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेच कामगार हित जोपासून त्यांच्या समस्या सोडवू शकतात आणि कामगारांच्या हितासाठी भाजपच आवश्यक आहे, हे त्यांना पटवून देण्यामध्ये ते यशस्वी झाले आहेत.

रविंद्र चव्हाण यांच्यावर विश्वास दाखवत आणि त्यांच्या मेहनतीचे फलित म्हणून संजय (बापू) निकम आणि पोपटराव पाटील यांच्या नेतृत्वात माथाडी कामगार युनियनच्या तब्बल २९ हजार कामगारांनी हाती कमळ घेतले.

या भव्य पक्षप्रवेश सोहळ्याला कराड उत्तर विधानसभा मतदारसंघाचे आमदार मनोज घोरपडे यांच्यासह अनेक भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## TReDS प्लॅटफॉर्म M1xchange चे झपाट्याने विकासावर लक्ष

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

एमएसएमई मंत्रालयाने दिनांक 7 नोव्हेंबर 2024 चा संदर्भच्या माध्यमातून 250 कोटी रूपये किंवा त्यापेक्षा अधिक वार्षिक उलाढाल असलेल्या कंपन्यांसाठी ट्रेड रिसीव्हेबल्स डिस्काऊंटिंग सिस्टमवर अनिवार्य नोंदणीची अंतिम मुदत म्हणून '31 मार्च 2025 तारखेची घोषणा केली आहे. यासह M1xchange हा भारतातील आघाडीचा RBI-परवानाकृत TReDS प्लॅटफॉर्म पुण्यामधून प्रबळ विकासाची अपेक्षा करत आहे. महाराष्ट्रातील महत्त्वपूर्ण औद्योगिक व आर्थिक हब असलेल्या पुणे शहरामध्ये अनेक सक्रिय कंपन्या आहेत, ज्या राज्याच्या आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. महाराष्ट्रातील आर्थिक विकासात पुणे हे तिसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे योगदान देणारे राज्य आहे, या प्रांताच्या विकासाला चालना देणाऱ्या 46,000 हून अधिक नोंदणीकृत कंपन्या आहेत. पुणे शहर भारतातील सर्वात मोठे ऑटोमोबाईल हब म्हणून ओळखले जाते, जेथे 368 हून अधिक ऑटोमोबाईल कंपन्या, 1,100 ऑटो कंपोनंट उत्पादक, 4,000 उत्पादन व सहाय्यक युनिट्स आणि 322 आयटी कंपन्या आहेत. पुण्यातील वैविध्यपूर्ण औद्योगिक परिसंस्था ऑटो स्पेअर पार्ट्स, हार्डवेअर, फार्मास्युटिकल्स, स्टील, संरक्षण उत्पादन आणि लॉजिस्टिक्स सेवा यांसारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये पसरलेली आहे, जी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांना सेवा देते. M1xchange सुधारित रोखप्रवाह व्यवस्थापन आणि विक्रेत्यांसोबत प्रबळ संबंधांच्या माध्यमातून या संस्थांच्या विकासाला पाठिंबा देण्यास उत्तमरित्या सुसज्ज आहे, जेथे पुरवठादारांना त्वरित पेमेंट्स आणि कमी निधी खर्चाची सुविधा देत आहे.

## यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या सर्व साधारण सभेत अभुतपुर्व गोंधळ

### संचालक मंडळाकडुन १३ विषय मंजूर झाल्याचे जाहीर

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

पुणे जिल्हातील थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखाना १४ वर्षांपासून पासुन बंद असुन संचालक मंडळानी घेतलेली सभासदांची सर्व साधारण सभा अभुतपुर्व गोंधळात पार पडली

चेअरमन सुभाष जगताप यांच्या अध्यक्षतेखाली थेऊर रस्त्यावरील वृंदावन कार्यालयात ही सर्व साधारण सभा पार पडली .

एके काळी महाराष्ट्रात आघाडी वर असलेला यशवंत कारखाना हा हवेली तालुक्याचा मानबिंदू होता. आर्थिक अडचणीत सापडल्याने या कारखान्याला कुठल्याही संस्थेने व बँकेने आर्थिक पुरवठा न केल्याने कारखाना १४ वर्षांपासून बंद आहे. सप्टेंबर २०१२ मध्ये रोजी विशेष सर्व साधारण सभेमध्ये कारखान्याची थोडीफार जमीन विक्रीचा ठराव सर्वानुमते पास करण्यात आला होता . पण आज पर्यंत कोणीही ही जमीन खरेदी करू शकले नाही. प्रत्येक निवडणूकीत कारखाना चालू करू असे राजकारणी आश्वासन देत आहेत . मागील वर्षी कारखान्याच्या संचालक मंडळाची निवडणूक होऊन नवीन संचालक मंडळ आले कारखाना चालू करण्यासाठी ९९.२७ एकर जमीन

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीला देण्याचा प्रस्ताव कारखान्याने दिला आहे .तसेच २६ तारखेला सर्वसाधारण सभेत तशी सभासदांची परवानगी सभासदांची घेण्यासाठी ही सभा घेण्यात आली . संचालक मंडळाने वृंदावन पॅलेस येथे सर्व साधारण सभेचे आयोजन कारखाण्याचे चेअरमन सुभाष जगताप यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले.

प्रभारी कार्यकारी कैलास जरे यांनी विषय पत्रिकेवरील विषय वाचण्यास सुरुवात करताच प्रचंड गोंधळ निर्माण झाला. त्यानंतर विषय पत्रिकेवरील विषयी संचालक मंडळाने अभुतपूर्व गोंधळात मंजूर करीत अवघ्या दहा ते पंधरा मिनिटात ही सभा गुंडाळली त्यामध्ये जमीन विक्रीचा विषय सुद्धा महत्त्वाचा मंजूर करून घेतला . या सभेस पांडुरंग काळे यांनी सभासदांची देणी कारखान्याने का दिली नाही म्हणून संचालक मंडळाला धारेवर धरले संचालक मंडळाने कारखान्याकडे शिल्लक नसल्याचे सांगितले त्यामुळे सभेस गोंधळ निर्माण झाला या गोंधळात संचालक मोरेश्वर काळे यांनी विषयपत्रिकेवरील सर्व विषय वाचत ठराव मंजूर आहे का म्हणून सभासदांना विचारताच आवाजी मतदानाने सभासदांनी ठराव मंजूर असल्याची घोषणा देत संचालक मंडळांनी सभा संपल्याचे जाहीर केले .



## लाभार्थ्यांना पहिला हप्ता खात्यावर वर्ग : पारनेरमध्ये घरकुलाचे ३६२३ लाभार्थी

### आमदार दाते यांच्या हस्ते पत्र वाटप

**पारनेर (दै. आरंभ पर्व)**

राज्याचे मुख्यमंत्री यांनी प्रशासकिय विभागासाठी शंभर दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्या अंतर्गत राज्य शासनाच्या वतीने गृहनिर्माण योजनांसाठी महाअवास अभियाना राबविण्यात आले. त्या निमित्ताने तालुक्यातील ४०२३ लाभार्थ्यांपैकी ३६२३ लाभार्थ्यांना पहिला हप्ता थेट संबंधित खात्यावर वर्ग करण्यात आला.

काही प्रातिनिधीक लाभार्थ्यांना त्यांच्या घरकुल मंजुरीचे पत्र आमदार काशिनाथ दाते सर यांच्या हस्ते देण्यात आले यावेळी गटविकास अधिकारी दयानंद पवार भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष दुधाडे पंचायत समितीचे विस्तार अधिकारी यांचे मान्यवर उपस्थित होते.

महा आवास योजना अभियानांतर्गत प्रातिनिधिक सरूपात घरकुल मंजूर असलेल्या लाभार्थ्यांना आमदार दाते सर यांच्या हस्ते घरकुल मंजुरीचे पत्र देण्यात आले राज्य सरकारने शंभर कृती आराखडा अंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी व लोकसभागासाठी आवाज अभियान राबवण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला त्या अंतर्गत सरकारचे गृहमंत्री राज्याचे मुख्यमंत्री ग्रामविकास व पंचायत

ग्रामिण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी राज्य मंत्र्यांच्या उपस्थितीत केंद्रीय गृहमंत्र्यांनी व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे राज्यभरातील प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थी तसेच संबंधित तालुक्याचे पदाधिकारी, सरपंच ,उपसरपंच व कार्यकर्त्यांची संवाद साधला. नागरिकांचे जीवनमान सुखकर होण्यासाठी व राज्य सरकारने प्रशासनाला दिलेल्या शंभर दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत पंतप्रधान आवास योजनेतील लाभार्थ्यांच्या घरकुलांना मंजुरी देण्यात आली प्राथमिक स्वरूपाचे मंजूर लाभार्थ्यांना मंजुरीचे पत्र पहिला त्याची वितरण करण्यात आले. अंमलबजावणी व लोकसहभागासाठी महाआवास अभियान राबविण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. त्या अंतर्गत भारत सरकारचे गृहमंत्री राज्याचे मुख्यमंत्री, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री यांच्या उपस्थीतीत केंद्रीय गृहमंत्री यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सदवारे राज्यभरातील प्रधानमंत्री आवास योजणेच्या लाभार्थी तसेच संबधीत तालुक्याचे पदाधिकारी , सरपंच उसरपंच व कार्यकर्त्यांशी संवाद साधला.

नागरीकांचे जीवनमान सुकर होण्यासाठी व राज्य सरकारने प्रशासनास दिलेल्या शंभर दिवसाच्या कृती आराखडा कार्यक्रमाअंतर्गत पंतप्रधान आवास योजणेतील उर्वरीत लाभार्थ्यांच्या घरकुलांना मंजुरी देण्यात आली. तसेच प्रातिनिधीक स्वरूपात मंजूर लाभार्थीना मंजूरीचे पत्र व त्यांना पहिला हाप्त्याचे वितरणही करण्यात आले.




> **महायुती सरकार सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या अनेक योजना राबविहित आहेत त्यानंतर गत ही घरकुल योजना आहे राज्यातील एक व्यक्ती घराविना राहू नये हे धोरण केंद्र व राज्य सरकारने घेतले आहे अद्यापही गरजू लाभार्थी घरकुलापासून वंचित आहेत त्यांनी आपली प्रकरणी पंचायत समिती सादर करावी.** - काशिनाथ दाते सर, आमदार

# किर्लोस्कर मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्यावतीने किरीट ५.० राष्ट्रस्तरीय केस ॲनालिसिस स्पर्धेचे यशस्वी आयोजन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

किर्लोस्कर मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट अर्थात केआयएमने आपल्या प्रतिष्ठित राष्ट्रस्तरीय केस ॲनालिसिस स्पर्धेची पाचवी आवृत्ती असलेल्या किरीट ५.० चे यशस्वी आयोजन केले.

१९९१ साली श्री. शंतनुराव लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली स्थापन झालेली केआयएम व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रातील सर्वोत्कृष्ट संस्था आहे. संस्थेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या किरीट ५.० च्या उपांत्य फेरीचा टप्पा १९ फेब्रुवारी रोजी कर्नाटकमधील हरिहर कॅम्पसमध्ये पार पडला, तर अंतिम फेरी २१ फेब्रुवारी रोजी महाराष्ट्रातील पुणे कॅम्पसमध्ये आयोजित करण्यात आली.




पूर्वीच्या यशस्वी आवृत्त्यांवर आधारित, किरीट ५.० ने युवा व्यवस्थापन प्रतिभेसाठी एक प्रमुख व्यासपीठ म्हणून आपले स्थान अधिक बळकट केले आहे. या स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांना समकालीन उद्योगांतील आव्हाने सोडवण्यासाठी विश्लेषणात्मक विचारसरणी आणि धोरणात्मक कौशल्ये प्रदर्शित करण्याची संधी मिळते. या स्पर्धेला किर्लोस्कर इंडस्ट्रीज लिमिटेड, किर्लोस्कर ऑइल इंजिन्स लिमिटेड, किर्लोस्कर न्यूमॅटिक कंपनी लिमिटेड, किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज लिमिटेड, किर्लोस्कर चिलर्स प्रायव्हेट लिमिटेड आणि अर्का फिनकॅप या किर्लोस्कर समूहाच्या नामांकित कंपन्यांचा पाठिंबा लाभला. व्यवस्थापकीय उत्कृष्टतेला चालना देण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेने स्पर्धेचे यश सुनिश्चित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

ही स्पर्धा विविध शैक्षणिक पार्श्वभूमीतील विद्यार्थ्यांसाठी खुली होती. चार वर्षांच्या पूर्णवेळ बीटेक, बीई अभ्यासक्रमातील आणि तीन वर्षांच्या पूर्णवेळ पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना यात सहभागी होण्याची संधी मिळाली. प्रत्येक संस्थेतील तीन सदस्यांच्या संघांना स्पर्धेत सहभागी होण्याची परवानगी होती. या स्पर्धेने महत्त्वाकांक्षी व्यवस्थापकांना त्यांची कल्पकता आणि समस्या सोडवण्याची क्षमता प्रदर्शित करण्यासाठी समान संधी देणारे व्यासपीठ मिळवून दिले.

स्पर्धेच्या नियमानुसार, तीन सदस्यांचा प्रत्येक संघ एकाच संस्थेतून असणे अनिवार्य होते तथापि ते वेगवेगळ्या शैक्षणिक वर्षातील असण्याची मुभा देण्यात आली होती. प्रत्येक विद्यार्थ्यास केवळ एका संघातून सहभाग घेण्याची परवानगी होती. संस्थांना एकापेक्षा अधिक संघाद्वारे सहभाग घेण्याची परवानगी देण्यात आली होती.

विश्लेषणात्मक आणि धोरणात्मक कौशल्ये तपासण्यासाठी स्पर्धा विविध टप्प्यांमध्ये विभागली गेली होती. पहिला टप्पा हा ऑनलाईन क्विझचा, दुसरा टप्पा हा ऑनलाईन केस स्टडी सादरीकरण, तर तिसरा टप्पा हा ऑन-ग्राउंड उपांत्य फेरी (हरिहर कॅम्पस) ज्यात टॉप १२ संघ होते आणि चौथा टप्पा हा ऑन-ग्राउंड अंतिम फेरीचा (पुणे कॅम्पस) होता ज्यात टॉप ८ संघांचा समावेश होता. प्रत्येक टप्प्यात सहभागी स्पर्धक संघाच्या विविध क्षमतेंचे मूल्यांकन करण्यात आले. यात जटिल व्यवस्थापकीय परिस्थितींचे विश्लेषण, नाविन्यपूर्ण व व्यावहारिक उपाय योजना यांचा प्रामुख्याने समावेश होता.

संस्थेचे संचालक डॉ. टी.जी. विजय यांनी स्वागतपर भाषणामध्ये किरीट ५.० ची महत्त्वाची वैशिष्ट्ये अधोरेखित केली. तसेच, किर्लोस्कर मॅनेजमेंट इन्स्टिट्यूटच्या व्यवस्थापकीय मंडळाच्या उपाध्यक्षा अदिती किर्लोस्कर यांनी परीक्षकांचे सन्मानपूर्वक स्वागत केले.

### विक्रमी प्रतिसाद आणि प्रतिष्ठित संस्थांचा सहभाग

**किरीट ५.० स्पर्धेला देशभरातून अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. संपूर्ण भारतातील एकूण २९,१७४ स्पर्धकांनी यात नोंदणी केली, त्यापैकी ४९५ संघ केस ॲनालिसिस टप्प्यात पोहोचले, १२ संघ उपांत्य फेरीत गेले आणि ८ संघ अंतिम फेरीत सहभागी झाले. सहभागी संघांमध्ये नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एनआयटी), इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (ट्रिपलआयटी) यांसारख्या प्रमुख संस्थांचा समावेश होता. अंतिम विजेते आणि बक्षिसे : स्पर्धेच्या अंतिम फेरीत उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या संघांचा सन्मान करण्यात आला. यात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (ट्रिपलआयटी), नागपूरचा संघ विजयी ठरला. ज्यात गौरव कुमार, अभिषेक सरकार आणि हिमांशू सिंग यांचा सहभाग होता. त्यांना १,००,००० रुपयांच्या रोख पारितोषकाने सन्मानित करण्यात आले. तर, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, रायपूरचा संघ उपविजेता ठरला. यात सुर्यांश श्रीवास्तव, सोमिल पुरी, याहू सिंग या सदस्यांचा समावेश होता. त्यांना ७५,००० रुपयांच्या रोख पारितोषकाने सन्मानित करण्यात आले. किरीट स्पर्धा दरवर्षी अधिक प्रतिष्ठित होत असून व्यवस्थापन क्षेत्रातील नवोदित प्रतिभावंतांसाठी नाविन्यपूर्ण विचार व नेतृत्वगुण वाढवणारा महत्वपूर्ण मंच ठरत आहे. किर्लोस्कर मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट भविष्यातील उद्योगपती घडवण्याच्या आपल्या ध्येयावर कायम असून, अशा स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांच्या व्यवस्थापन कौशल्यांना अधिक चांगले बनवत त्यांना तापून सुलाखून काढणारे व्यासपीठ प्रदान करत आहे.**

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.